**(CNR No.MHND060007942013)**

नियमीत दिवाणी दावा क्र. ११८/२०१३
इरन्ना हिंगमीरे विरूध्द हणमाबाई हिंगमीरे वगैरे

**आदेश निशाणी क्र. १०० वर**

प्रतिवादी क्र. १ व २ यांनी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, बिलोली यांनी आरबी/कार्या—२/जमाबंदी/सीआर/२/९३/ जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड प्रमाणे दि.११.०२.१९९३ रोजी च्या पत्रानुसार दि.२७.०३.१९९३ रोजी करण्यात आलेल्या विवाद्य शेत जमीनीचा मोजणीचा नकाशा रेकॉर्डवर दाखल केला आहे. सदर मोजणी ही नियमीत दिवाणी दावा क्र.३६९/८१ या प्रकरणाकरीता करण्यात आलेली आहे. ही मोजणी श्री. ए.एस. दरवेशवार, भुमापक यांनी केलेली आहे. त्यामुळे त्यांना या प्रकरणात प्रतिवादी क्र. १ व २ यांचेतर्फे साक्षीदार म्हणुन साक्षी समन्स पाठविण्यात यावेत यासाठी हा अर्ज देण्यात आलेला आहे.

२. त्यावर वादी यांनी त्यांचा जोरदार आक्षेप नोंदवलेला आहे. नियमीत दावा क्र.३६९/८१ हा प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे सासरे व इतर यांचेविरूध्द वाटपासाठी दाखल केला होता. त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांना ५/१२ वा हिस्सा देण्यात आलेला आहे. त्या हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी सदर मोजणी करण्यात आलेली आहे. ती मोजणी योग्यरित्या केलेली नाही. या प्रकरणाशी त्या मोजणीचा काहीही संबंध नाही. त्या मोजणी नकाशाच्या विसंगत माहिती प्रतिवादी यांनी त्यांचे उलटतपासणीमध्ये दिलेली आहे. सदर अर्ज हा केवळ ती विसंगत माहिती दुरूस्त करण्यासाठी दिलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा असे त्यांनी सागीतले.

३. अर्जाचे अवलोकन केले असता सन १९९३ रोजी झालेल्या मोजणीबाबत साक्षीदार यांना बोलावण्यासाठी हा अर्ज देण्यात आलेला आहे. त्यामध्ये भुमापक श्री. ए.एस. दरवेशवार हे सध्या कोठे आहेत याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. प्रस्तुत दावा हा सन २०१३ पासून प्रलंबित आहे. जुनी प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्याचे माननीय वरिष्ठ न्यायालय यांचे निर्देश आहेत. साक्षीदार यांचा योग्य व संपुर्ण पत्ता दिलेला नसल्यामुळे सदर समन्सची बजावणी होउ शकणार नाही असे माझे मत आहे.

४. नियमीत दावा क्र. ३६९/८१ च्या न्यायनिर्णयाची प्रत रेकॉर्डवर आहे. वादी यांनी प्रस्तुत दावा सन २०१३ मध्ये दावा मिळकतीचे वादी हे मालक व कब्जेदार आहेत असे जाहीर होउन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. या प्रकरणामध्ये कोर्ट कमिशनर यांचेमार्फत मोजणी करण्यात आलेली आहे. त्यामुळे आता सन १९९३ मधील मोजणी संबंधीचा नकाशा सिध्द करण्यासाठी योग्य पत्ता माहिती नसलेले भुमापक यांना साक्षी समन्स पाठवणे म्हणजे कालापव्यय ठरेल. इतर साक्षी पुराव्याचे आधारे सदर बाब प्रतिवादी हे सिध्द करू शकतात. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे देत आहे.

## **<u>आदेश</u>**

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/—

(श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार)

दिनांक :— १८ ऑगस्ट २०१८. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बिलोली

## प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील/आदेशामधील शब्द—नि—शब्द हे मुळ न्यायनिर्णय/आदेश प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | एम.एफ.एम. सय्यद |
| न्यायालयाचे नाव | : | (श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार)<br>दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बिलोली |
| आदेश दिनांक | : | १८.०८.२०१८. |
| आदेशावर पिठासीन अधिकारी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | : | १८.०८.२०१८. |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांक | : | १८.०८.२०१८. |